# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी च्या **राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे** आज दिनांक 9 ऑगस्ट रोजी ऑगस्ट **क्रांती दिनाचा कार्यक्रम** आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिभाऊ वेरुळकर उपस्थित होते. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. प्रविण काळे, डॉ. संजय धनविजय तसेच प्रा. धर्मेश राऊत यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. हरिभाऊ वेरुळकर यांनी 1942 मधील भारतीय परिस्थितींचा ऊहापोह करुन हुतात्मांचे बलिदानाची आठवण करून दिली व  विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी  महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचा संचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. श्यामप्रकाश पांडे यांनी केला तर आभार कार्यक्रम अधिकारी डॉ. विजया मुळे यांनी मानले.









कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.